Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 179 – 184

DOI: 10.5281/zenodo.10115330

Original Research Article

# महात्मा गांधी आणि असहकार आंदोलन

श्री निमिष संभुदेव जाधव

संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, कलिना, सांताक्रूझ, मुंबई – ४०००९८ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: nimishjadhav45@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 26 October, 2023

**गोषवारा**

इ.स. १८५७ ला बंड झाले. यालाच अठराशे सत्तावनचा उठाव असे देखील म्हणतात. ब्रिटिशांनी हा उठाव यशस्वीपणे मोडून काढला. त्यांनतर भारतात राजकीय, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात बदल घडून आले. अशातच इ.स १८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या पक्षाची स्थापना झाली. काँग्रेस या पक्षाची कार्यप्रणाली तीन प्रकारे दिसून आली – मवाळ, जहाल आणि गांधीयुग. गांधी युग हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील एक नवीन पर्व होते. देशाच्या राजकारणात महात्मा गांधींच्या नेतृत्वाचा उदय झाला. त्यांनी नि:शस्त्र प्रतिकाराच्या अभिनव मार्गाचा अवलंब केल्यामुळे देशाच्या स्वातंत्र्यासाठी झालेल्या राजकीय लढ्यात देशातील सामान्य जनता मोठ्या प्रमाणात सामील झाली. इ.स. १९२० ते १९२२ या काळात असहकार आंदोलन उभारले गेले. पण या आंदोलनाला हिंसात्मक वळण लागले, उदाहरणार्थ चौरीचौरा प्रकरण होय. त्यामुळे ह्या चळवळीला स्थगिती देण्यात आली.

**महत्वाचे शब्द –** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय स्वातंत्र्य चळवळ, असहकार चळवळ, चौरीचौरा प्रकरण.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी

इ.स. १८५७ ला उठाव घडून आला. ब्रिटिशांद्वारे दडपण्यात आला. इ.स. १८५७ ह्या उठावाला काही जण शिपयांचे बंड, भट-पांड्यचे कारस्थान तर काही हे पहिले स्वातंत्र्यसमर म्हणतात.[१] अठराशे सत्तावन नंतर भारतात विशेषतः राजकीय क्षेत्रात बदल घडून आले. इ.स. १८८५ साली सर अँलन ह्युम ह्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या राजकीय पक्षाची स्थापना केली.[२] काँग्रेस ही संघटना सुरुवातीचा काही ५ ते ७ वर्ष काँग्रेस ही बाल्यावस्थेत होती. या काळात ब्रिटिशांचे बोट धरून या पक्षाची वाटचाल सुरू होती. पण लवकरच काँग्रेसने इंग्रजांच्या भरवशावर राहणे सोडून

दिले व स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न सुरू केला, त्यातूनच ती कृतीशील बनत गेली.[३] भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वाटचालीचे स्थूलमानाने तीन कालखंड पाडले जातात, १) इ.स. १८८५ ते १९०५ हा कालखंड 'उदारमतवादी किंवा नेमस्त' म्हणून ओळखला जातो. २) इ.स. १९०५ ते १९२० पर्यंतचा हा कालखंड 'जहालमतवादी' म्हणून ओळखला जातो. ३) इ.स. १९२० ते १९४७ या कालखंडावर महात्मा गांधीचा प्रभाव राहिला, म्हणून या कालखंडाला 'गांधीवादी' असे म्हटले जाते.[४]

**महात्मा गांधी : परिचय आणि प्रारंभीची कामगिरी**

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म इ.स. १८६९ साली काठेवाडीमधील पोरबंदर मध्ये झाला.[५] प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाल्यावर महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते मुंबईला आले. त्या आधी वयाच्या १२ व्या वर्षी त्यांचा विवाह कस्तुरबांशी झाला. इ.स. १८८८ मध्ये कायदयची पदवी मिळवण्यासाठी विलायतेस गेले. तेथे बॅरिस्टर बनून मायदेशी परतले. मुंबईच्या न्यायालयामध्ये वकिली करण्यास सुरुवात केली. याच काळात त्यांच्या मनात भारतीय राजकारणाची बीजे रुजू लागली.[६] गांधीजींनी आपल्या अहिंसात्मक चळवळीचा पहिला प्रयोग दक्षिण आफ्रिकेत केला.[७] इ.स. १८९३ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिश वसाहत नातळमध्ये खटला लढण्यासाठी गेले असता त्यांच्या जीवनाला नवीन वळण लागले. तेथील ब्रिटिशांनी माजवलेला वर्णभेदाचा त्यांना अनुभव आला.[८] याविरुद्ध गांधीजींनी सत्याग्रहाचा अहिंसात्मक लढा सुरू केला. इ.स. १९०६ ते १९१४ या काळात आफ्रिकेतील सरकारला नमवून अनेक कर व कायदे रद्द करून घेतले. त्यांच्या सत्याग्रहाचा हा पहिला मोठा विजय होता.

गोपाळ कृष्ण गोखले यांच्या आग्रहाने १९१५ मध्ये ते मायदेशी परतले. गोखलेंना राजकीय गुरू मानून त्यांनी राजकारणात प्रवेश केला. भारतात परतलेल्या गांधीजींचे भव्य स्वागत केले.[९] त्यांनी लगोलग काँग्रेसच्या संघटनेत प्रामुख्याने भाग घेतला नाही. ते काँग्रेसच्या परिघावरच होते. त्यांनी काही स्थानिक चळवळी केल्या. उदा. खेडा सत्याग्रह, चंपारण्य सत्याग्रह हे पूर्ण यशस्वी झाले. त्यातून त्यांची लोकप्रियता वाढली.[१०] महात्मा गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले.[11] स्वातंत्र्यलढ्याला गांधीजींनी अशी विलक्षण कलाटणी दिली की तोपर्यंत त्या आंदोलनापासून दूर असणारी माणसेही चळवळीत हिरीरीने भाग घेऊन तुरुंगवास भोगू लागली. गांधीजींनी आशी माणसाला उपोषणाची दीक्षा दिली, नि:शस्त्राला अहिंसेचे 'शस्त्र' दिले आणि दुर्बळाला सत्याग्रहाची शिकवण देऊन अन्यायाविरुद्ध लढण्याची शक्ती दिली. त्यामुळे हिंदुस्थानातील लोकांनी 'राष्ट्रपिता' ही ओजड पदवी त्यांना दिली.[१२] 'यंग इंडिया' आणि 'हरिजन' या नियतकालिकांतून गांधीजींनी विविध विषयांवर विपुल लेखन केले.[१३]

**रौलट विधेयक (१८ मार्च १९९९)**

मार्च १९१९ मध्ये केंद्रीय कायदेमंडळातील प्रत्येक भारतीय सभासदाने केलेल्या विरोधाला न जुमानता 'रौलट अँक्ट' हा कायदा करण्यात आला. कोणत्याही व्यक्तीवर न्यायालयात खटला न भरता किंवा त्याला रीतसर शिक्षा न देता त्याला तुरुंगात डांबण्याचा अधिकार या कायद्याद्वारे सरकारला मिळाला.[१४] देशात या कायद्याच्या विरुद्ध तीव्र असंतोष

निर्माण झाला. गांधीजींनी या कायद्यास 'काळा कायदा' (Black Act) असे संबोधले. या कायद्याविरुद्ध जनचळवळ सुरू करण्याची जबाबदारी गांधीजींवर येऊन पडली. गांधीजींनी सत्याग्रहाच्या माध्यमातून रौलट कायद्याला विरोध करावयाचे ठरविले. ६ एप्रिल १९१९ ही सत्याग्रहाची तारीख निश्चित करण्यात आली. ६ एप्रिलचा हरताळ होता, मात्र नियोजित सत्याग्रहापेक्षा प्रत्यक्षातील चळवळ वेगळीच ठरली. सर्व ठिकाणी चळवळीला हिंसक वळण लागले.[१५]

**जालियनवाला बाग हत्याकांड (१३ एप्रिल १९१९)**

१३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसरच्या जालियनवाला बागेत रौलट कायद्याविरुद्ध निषेध सभा झाली. सभेला २०-२५ हजारांचा समुदाय होता. त्यात वृद्ध होते, मुले होती, स्त्रियांही होत्या. काही लोक तर नेहमीसारखे फिरायला आले होते व सभेला थांबले. जमाव शांत व पूर्ण नि:शस्त्र होता.[१६] याच दिवशी जनरल डायरच्या आदेशानुसार अमृतसर येथील जालियनवाला बागेत नि:शस्त्र स्वातंत्र्यसैनिकांवर अवघ्या १० मिनिटात तब्बल १,६०० फेरी निदर्यपणे झाडण्यात आल्या. यात ३८८ जणांचा मृत्यू झाल्याची व शेकडो जण जखमी झाल्याची नोंद असली तरी प्रत्यक्षात मृतांचा आकडा १,००० पेक्षा जास्त आहे, असे सांगण्यात येते.[१७] जालियनवाला बाग हत्याकांडाने अहिंसक गांधीजी बंडखोर बनले. त्यांनी विधान केले की, "ब्रिटिश सरकार हे पापी सैतान आहे आणि या सैतानाचा नायनाट केलाच पाहिजे. सैतानाशी तडजोड करणे शक्य नसते."[१८]

**खिलाफत चळवळ**

खिलाफत म्हणजे खलिफाची धार्मिक व राजकीय सत्ता तुर्कस्थानचा सुलतान हा सर्व मुस्लिम जगाचा वरिष्ठ धर्मधिकारी म्हणून अनेक शतके मानला जात होता. इ.स. १९१४ साली सुरू झालेल्या पहिल्या जागतिक महायुद्धात तुर्कस्तान दोस्त राष्ट्रांच्या विरुद्ध उभा होता. या युद्धात जर्मनीबरोबर तुर्कस्तानाचाही पराभव झाला. कॉन्स्टिटस्टीनोपल, आशिया, थ्रेस इ. प्रदेश दोस्तांनी व्यापले; तुर्की साम्राज्य कोसळण्याच्या परिस्थितीत होते. विजयी ब्रिटन व फ्रान्स यांनी खलिफा तुर्की सुलतान यांच्या साम्राज्याचे तुकडे पाडून ते आपल्या अखत्यारीखाली घेतले. दोस्त राष्ट्रे खिलाफत बरखास्त करणार अशी स्थिती उत्पन्न झाली. पहिल्या महायुद्धात मुसलमानांसह सर्व भारतीयांनी भाग घ्यावा, म्हणून भारतीय मुसलमानांना ब्रिटिशांनी त्यांच्या धार्मिक श्रद्धास्थानांचे महत्व कायम ठेवले जाईल, असे आश्वासन दिले होते. परंतु विजयानंतर या गोष्टीचा साहजिकच विसर पडला. तुर्की खिलाफत नष्ट होत आहे आणि ब्रिटिश सत्ताधारी त्यास कारणीभूत होत आहेत, म्हणून भारतातील मुस्लिम समाजाने गांधीजींच्या नेतृत्वाखाली खिलाफत चळवळ सुरू करण्याचा निश्चय केला. हिंदु-मुस्लिम ऐक्याकरिता गांधीजी धडपडत होते. त्यांनी असहकारितेच्या आंदोलनाला खिलाफत चळवळीची जोड दिली.[१९]

**असहकार आंदोलनाचे स्वरूप (१९२०-१९२२)**

अमृतसर येथे काँग्रेसचे दरसाल भरणारे अधिवेशन १९१९ डिसेंबरअखेर पार पडले आणि याच अधिवेशनामध्ये पास झालेल्या ठरावात त्यावेळी येऊ घातलेल्या माँटेग्यू-चेम्सफर्ड राजकीय सुधारणा 'अपुऱ्या, असमाधानकारक आणि निराशाजनक' आहेत असें त्यांचे वर्णन करण्यात येऊन त्यांची जी काही किंमत असेल ती लक्षात घेऊन त्या राबवाव्या असें

ठरले.[२०] गांधीजी मुसलमानांना बरोबर घेऊन १ ऑगस्ट १९२० रोजी असहकार आंदोलनाला प्रारंभ करण्याचा निर्णय घेतला. लोकमान्य टिळकांनी या निर्णयास आपला पाठिंबा दर्शविला;[२१] परंतु त्याच दिवशी १ ऑगस्ट १९२० लोकमान्य टिळकांचा दुर्दैवाने मृत्यू झाला.[२२] ४ सप्टेंबर १९२० रोजी कलकत्ता येथे लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात असहकाराच्या कार्यक्रमाला मान्यता देण्यासंबंधीचा ठराव संमत करण्यात आला.[२३]

**असहकार आंदोलनाचा कार्यक्रम**

खिलाफतीबाबत झालेला अन्याय, पंजाबमधील अत्याचार यांचा निषेध आणि स्वराज्य नाकारणे या अन्यायाविरुद्ध हे आंदोलन होणार होते. गांधींच्या नेहमीच्या पध्दतीप्रमाणे हे आंदोलन टप्याटप्याने वाढत जाणार होते – १) सुरुवातीला सरकारने दिलेल्या पदव्या व सन्मान परत करून होणार होती. २) इंग्रज सरकारने १९१९ साली देशाच्या राज्यकारभारात नवीन सुधारणा केल्या होत्या. केंद्रात व प्रांतात विधिमंडळे स्थापून तेथे लोकांचे प्रतिनिधी निवडून यावेत व त्यांनी राज्यकारभारावर नियंत्रण ठेवावे अशी तरतूद केली होती. या निव्हडणुकांवर काँग्रेसने बहिष्कार टाकावा, म्हणजे निवडणुकांना उमेदवार उभे करू नयेत व मतदारांनी मतदान करू नये. ३) सरकारी मदतीने चालणाऱ्या शिक्षणसंस्थांवर विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी बहिष्कार टाकावा. वकील आणि आशिले यांनी सरकारची न्यायालयांच्या कामात भाग घेऊ नये, हा पुढचा कार्यक्रम होता. ४) परदेशी वस्तु मुख्यतः कापड लोकांनी वापरू नये व स्वदेशी वापरून देशी उद्योगांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन केले गेले होते. ५) शेवटची पायरी म्हणजे सरकारी कर बंद करून सरकारची कोंडी करावी.

असहकाराच्या आंदोलनाची रूपरेखा पाहता असे स्पष्ट होते की, या आंदोलनात अशी नवी व्यवस्था अभि करणे हे होते. सरकाला समांतर अशी नवी व्यवस्था उभी करणे हे होते. सरकारकडून राज्यकारभारात लोकप्रतिनिधींना अधिक सहभाग मिळावा व प्रजेला नवीन सवलती प्राप्त व्हाव्यात. आता गांधीजी सांगत होते की, सरकारकडे पूर्ण दुर्लक्ष करून लोकांनी स्वतःची शासन निर्माण करावे. ही विचारसरणी क्रांतिकारक होती. 'शिक्षणसंस्थावर बहिष्कार टाका' याचा अर्थ 'स्वतःच्या पैशावर निर्वाह करण्याऱ्या स्वतंत्र शिक्षणसंस्था स्थापन करा.' 'सरकारी न्यायालयाकडे जाऊ नका' याचा परिणाम 'स्वतःच्या न्यायपंचतींचे गठन करा.' अखेर सरकारी नोकरी सोडा.[२४]

**चौरीचौरा प्रकरण**

महात्मा गांधीच्या असहकार आंदोलनादरम्यान ३००० शेतकऱ्यांच्या मोर्चावर पोलिसांनी गोळीबार केलेल्या संतप्त जमावाने ४ फेब्रुवारी १९२२ गोरखपूरमधील चौरीचौरा पोलीस स्टेशनवर हल्ला करून ते पेटवून दिले. यामध्ये २३ पोलिसांचा मृत्यू झाला. तत्पुर्वी चौरीचौरा पोलीस स्टेशनच्या मुडेंरा बाजारामध्ये काही काँग्रेस कार्यकर्त्यांनी हत्या केल्याचे समजल्यानंतर संतप्त जमाव पोलीस स्टेशनबाहेर जमा झाला होता. या हिंसाचारानंतर महात्मा गांधीजींनी ११ फेब्रुवारी १९२२ रोजी असहकार आंदोलन मागे घेण्यात आले.[२५]

## उपसंहार

इ.स. १८५७ च्या उठवानंतर भारतात सर्वत्र बदल घडून आले. इ.स. १८८५ साली काँग्रेस या पक्षाची स्थापना झाली. पुढे या पक्षाचे कार्य तीन टप्प्यात दिसून आले – मवाळ, जहाल आणि गांधीयुग. गांधीयुगातील एक पर्व म्हणजे 'असहकार आंदोलन' होय. भारतीय राजकारणात झालेला महात्मा गांधींचा उदय अत्यंत महत्वाची गोष्ट होती. त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण नेतृत्व आणि लढ्यासाठी त्यांनी वापरलेले अभिनव तंत्र यांमुळे भारतीय राष्ट्रीय चळवळीचे स्वरूप पालटून गेले. इंग्रज सरकारने जनतेतील असंतोष दडपून टाकण्यासाठी जुलमी कायदे केले उदा. रौलट विधेयक, दडपशाहीचा वरवंटा फिरवला. त्यातूनच जालियनवाला बाग हत्याकांड सारखी भयानक घटना घडली. हंटर कमिशनाचा असमाधानकारक अहवाल, पंजाबमध्ये घडलेल्या अमानुष अत्याचार या सर्व घटनांमुळे इंग्रज सरकारवरचा विश्वास उडाला. गांधीजींनी असहकार आंदोलनाची तुंतारी फुंकली. हे आंदोलन फार तीव्र होते. या आंदोलनात हिंदु-मुस्लिम एकी दिसून आली.[२६] पण चौरीचौरा प्रकरणामुळे हे आंदोलन मागे घेण्यात आले.

## संदर्भ साधने


१. डॉ. श्रीनिवास वैद्य, कोकण इतिहास परिषद (खंड १०), न्यू मॅन पब्लिकेशन, परभणी, २०२१, पृ – ७०.

२. प्रा. महेश भागवत, प्रा. मेघा ढापरे, प्रा. शुभराज पी. बुवा, डॉ. एस. एम. वाघ, प्रा. डॉ. हर्षद के. भोसले, प्रा. केतन भोसले, प्रा. महेश बिऱ्हाडे, प्रा. प्रीती सावळे, प्रा. निलेश ए. पाटील, भारतीय राजकीय व्यवस्था, शेठ पब्लिशर्स, मुंबई, २०१७, पृ – ९२.

३. प्रा. जितेंद्र सुरेश भामरे, आधुनिक भारताचा इतिहास, शेठ पब्लिशर्स, मुंबई, २०१६, पृ – २०.

४. आधुनिक भारताचा इतिहास (१७५७ ते २०१५), स्पेक्ट्रम, के'सागर पब्लिकेशन, पुणे, २०१९, पृ – ८४,९४.

५. मोहनदास करमचंद गांधी, सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, सीताराम पुरुषोत्तम पटवर्धन (अनुवाद), रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, २०१८, पृ – १६.

६. प्रा. जितेंद्र सुरेश भामरे, आधुनिक भारताचा इतिहास, उपरोक्त, पृ – ४१.

७. सामना, उसत्व, ६/०८/२०२३.

८. प्रा. जितेंद्र सुरेश भामरे, जगाच्या इतिहासातील महत्वाचे टप्पे (इ.स. १३०० ते १९४५), शेठ पब्लिशर्स, मुंबई, २०१२, पृ – १८७.

९. प्रा. जितेंद्र सुरेश भामरे, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८४८-१९६०), शेठ पब्लिशर्स, मुंबई, २०१५, पृ – ७३.

१०. लोकसत्ता, दिवाळी – २०१९, अंतरंग, पृ – १२६.

११. सकाळ, NiE पुरवणी, ४/०८/२०२३.

१२. लोकसत्ता, दिवाळी – २०१९, उपरोक्त, पृ – १२६.

१३. सकाळ, २/१०/२०२२.

१४.बिपीन चंद्र, मॉडर्न इंडीया, डॉ. एम. व्ही. काळे (अनुवाद), के'सागर पब्लिकेशन, पुणे, २०२२, पृ – १५८.

१५.श्री. रंजन कोळंबे, आधुनिक भारताचा इतिहास, भगीरथ प्रकाशन, पुणे, २०१९, पृ – २१०.

१६. प्रा. ना. सी. दीक्षित, डॉ. अरुण भोसले, आधुनिक भारताचा इतिहास, पुस्तक २ – राष्ट्रीय चळवळ (१८८५-१९४७), संपादक – डॉ. अरविंद देशपांडे, डॉ. र. ना. वरखेडे, डॉ. ह. अ. फडके, डॉ. ना. रा. चौधरी, डॉ. सौ. सरल प्र. धारणकार, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृ :- ३७.

१७.लोकमत, १६/०८/२०२२.

१८. सामना, उसत्व, ६/०८/२०२३.

१९. https://mr.vikaspedia.in/education/children-corner/भारतीयखिलाफतचळवळ-विकासपीडिया.

२०.त्र्यं. वि. पर्वते, गांधी-पर्व, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८५, पृ - १७

२१. प्रा. ना. सी. दीक्षित, डॉ. अरुण भोसले, आधुनिक भारताचा इतिहास, तत्रेव, पृ – १३८

२२.सामना, १/०८/२०२३.

२३.आधुनिक भारताचा इतिहास (१७५७ ते २०१५), स्पेक्ट्रम, उपरोक्त, पृ – १३४.

२४.लोकसत्ता, दिवाळी – २०१९, अंतरंग, पृ – १३०,१३१.

२५.https://www.bbc.com/hindi/india-55921031.amp

२६.प्रा. ना. सी. दीक्षित, आधुनिक भारताचा इतिहास, कित्ता, पृ – ४१.